सकाळ

# सहकार विद्यापीठाला निधीचा बूस्टर

## ११ कोटींची तरतूद केल्याची विद्याधर अनास्कर यांची माहिती



विद्याधर अनास्कर

पुणे, ता. २ : वैकुंठभाई मेहता राष्ट्रीय प्रबंधन सहकारी (व्हॅम्निकॉम) संस्थेचे रुपांतर सहकार विद्यापीठात होण्याच्या दृष्टीने पहिले पाऊल पडले आहे. त्यासाठी वैकुंठभाई मेहता राष्ट्रीय प्रबंधन संस्थेला स्वायत्ततेचा दर्जा देऊन यावर्षीच्या केंद्रीय अर्थसंकल्पात ११ कोटी रुपयांची तरतूद केली आहे, अशी माहिती राज्य सहकारी बॅंकेचे अध्यक्ष विद्याधर अनास्कर यांनी दिली.

डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे बृहन महाराष्ट्र वाणिज्य महाविद्यालय (बीएमसीसी) आणि बीएमसीसी माजी विद्यार्थी संघटना यांच्या वतीने आयोजित अर्थसंकल्पावरील चर्चासत्रात अनास्कर बोलत होते. अधिवक्ते गोविंद पटवर्धन, सनदी लेखापाल भरत फाटक, ग्राहक पेठेचे सूर्यकांत पाठक यांनी चर्चासत्रात सहभाग घेतला.

अनास्कर म्हणाले, ''सहकार क्षेत्रासाठी ९०० कोटी रुपयांची तरतूद केली आहे. प्राप्तिकर कमी करणे, अधिभार कमी करणे, सहकारासाठी विविध योजना, ७५ डिजिटल बॅंका, टपाल कार्यालयांच्या माध्यमातून डिजिटल बॅंकिंग, सुक्ष्म लघु उद्योगांसाठी दोन लाख कोटी रुपयांचा निधी यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्था गतिमान होण्यास मदत होईल.''

पटवर्धन म्हणाले, ''वस्तू व सेवा कर (जीएसटी)ची पूर्वलक्षी अंमलबजावणी योग्य प्रकारे होत नाही. दंडाची रक्कम, विलंब शुल्क यामुळे उत्पन्न वाढते. ते कराच्या माध्यमातून वाढले पाहिजे. त्यासाठी आवश्यक सुधारणा केल्या पाहिजेत. जीएसटीतील चुका दुरुस्त करण्यासाठी एक संधी देणे आवश्यक होते.''

फाटक म्हणाले, ''प्राप्तिकर, जीएसटी आणि प्रत्यक्ष करात मोठी वाढ झाली असल्यामुळे स्थैर्य देण्यासाठी त्यामध्ये बदल करण्यात आलेले आहेत. भांडवली खर्चात वाढ केल्याने पायाभूत सुविधांचा विकास होईल. त्यामुळे रोजगाराची निर्मिती होईल, क्षमता वाढतील, उत्पन्न वाढण्यास मदत होईल.''

पाठक म्हणाले, ''रस्ते, रेल्वेसाठी भरीव तरतूद केल्यामुळे प्रवास गतिमान होणार आहे. त्यामुळे सामान्य माणसांना फायदा होईल. सामान्य नागरिकांना वस्तू स्वस्त मिळाव्या, यासाठी जीएसटीत आवश्यक बदल केले पाहिजेत. त्यासाठी लोकप्रतिनिधी आणि व्यापारी संघटनांनी आवाज उठवला पाहिजे.''

प्राचार्या डॉ. सीमा पुरोहित यांनी उपस्थितांचे स्वागत केले. माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष अरुण निम्हण यांनी प्रास्ताविक केले. सचिव सुहास पटवर्धन आणि खजिनदार सुहास धारणे यांनी सूत्रसंचालन तर, सीमा तोडकर यांनी आभार मानले.

### 'सकाळ'चा पाठपुरावा

केंद्राच्या बॅंकिंग नियमन कायद्यातील सुधारणा आणि रिझर्व्ह बॅंकेच्या कठोर नियमांमुळे नागरी सहकारी बॅंक आणि पतसंस्थांना अडचणींना सामोरे जावे लागत आहे. या प्रश्नांवर मार्ग काढून केंद्र सरकारने सहकार क्षेत्राला दिलासा द्यावा, या संदर्भात पुण्यात मागील ऑक्टोबर महिन्यात 'सकाळ'च्या वतीने सहकार महापरिषदेचे (सकाळ महाकॉनक्लेव्ह) आयोजन केले होते. विविध मागण्यांसोबतच सहकार विद्यापीठाची स्थापना करावी, असा ठराव पारित केला होता. याबाबत केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा यांच्याकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.